शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२...

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.९२९२/२०२३ मधील दिलेल्या निदेशानुसार श्रीम.कल्याणी जोशी यांच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याच्या अर्जावर सुनावणी घेवून निर्णय घेण्याबत...

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन आदेश क्रमांकः संकीर्ण-२०२३/प्र.क्र.६५/क्रीयुसे-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: २६ ऑगस्ट, २०२३

वाचा-

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.१४ डिसेंबर, २०२२
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.शिछपु-२०२०/प्र.क्र.९३/क्रीयुसे-२, दि.३१ जानेवारी, २०२३
३. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ याचिका क्र.९२९२/२०२३ मधील दि.२४/८/२०२३चे आदेश
४. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीच्या दिनांक २५/८/२०२३ रोजी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना -

श्रीम.कल्याणी जोशी यांनी वुशू या क्रीडा प्रकाराकरीता सन २०१९-२० या वर्षांतील पुरस्काराकरिता अर्ज सादर केला होता. राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीने श्रीम.जोशी यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्तावेजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित करून देण्यात आलेल्या अटीची पूर्तता होत नसल्याने त्यांना पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते. शासनाच्या या निर्णयाविरोधात श्रीम.जोशी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.९२९२/२०२३ दाखल केली असता सदर याचिकेबाबत दिनांक २४/०८/२०२३ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने श्रीम.जोशी यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्याबाबत विहीत शासन निर्णयातील तरतुदी विचारात घेवून पुनर्विचार करावा असे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने श्रीम.कल्याणी जोशी यांच्या प्रकरणी निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन आदेश -

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) करीता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ-३” मधील नियम क्र.६ मधील क्र.६.१ नुसार खेळाडूस पुरस्कार वर्षापासून लगतपूर्व ५ वर्षामध्ये कोणत्याही तीन वर्षात संबंधित खेळाडूने अधिकृत संघातर्फे संबंधित खेळाच्या अधिकृत राष्ट्रीय फेडरेशन मार्फत आयोजित वरिष्ठ गटाच्या (सिनीअर) राष्ट्रीय स्पर्धेमध्ये/राष्ट्रीय स्पर्धा (नॅशनल गेम्स) मध्ये महाराष्ट्राच्या प्रातिनिधीक संघाकडून सहभागी होवून किमान एक पदक (प्राविण्य) संपादन केले आहे अशा खेळाडूंचा गुणांकना करीता विचार करण्यात येईल. तसेच नियम क्रमांक १७ अन्वये सर्वोत्कृष्ट गुण प्राप्त खेळाडूपैकी एक पुरुष व एक महिला यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वर्ष सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षा करीता महिला व पुरुष दोन्ही मिळून एकूण १२ अर्ज प्राप्त झालेले आहेत. श्रीम.जोशी यांच्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व दस्ताऐवजांची छाननी करून शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू) नियमावलीतील नियम क्र.६.१ अन्वये विहित करून देण्यात आलेल्या अटीची पूर्तता होत नसल्याने त्यांना पुरस्काराकरीता अपात्र ठरविले होते.

२. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी पारित केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २५/०८/२०२३ रोजी दूरदृष्यप्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्स) आयोजित केलेल्या बैठकीमध्ये श्रीम.जोशी यांनी निदर्शनास आणले की, सन २०२०-२१ या वर्षामध्ये पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या श्रीमती मिताली वाणी यांना २९व्या सिनियर राष्ट्रीय वुशू स्पर्धेत (दि. २५.०२.२०२१ ते दि. ०२.०३.२०२१) कुंग फू तायजी फॅन मध्ये व्दितीय व तायजी क्वान मध्ये तृतीय क्रमांक संपादन केल्याच्या प्रमाणपत्रास गुण देण्यात आलेले आहे. वुशू संघटनेने आयोजित कुंग फू उप प्रकाराच्या स्पर्धेकरीता समान तत्वाने त्यादेखील गुणांकनाकरीता पात्र ठरतात. त्यानुसार त्यांनाही ८व्या जागतिक कुंग फू चॅम्पियनशिपमधील दोन कांस्य पदकांसाठी गुण मिळावेत, अशी मागणी केली आहे.

३. याबाबत नमूद करण्यात येते की, वुशू या क्रीडा प्रकारात वुशू आणि कुंग फू या दोन उप प्रकारांच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन होते. वुशू हा क्रीडा प्रकार आशियाई क्रीडा स्पर्धेत समाविष्ट असून या क्रीडा प्रकारांतर्गत खालील उपप्रकारांचे महिला गटात आयोजन केले जाते -

- चांगक्वान
- नानक्वान
- तायजिक्वान
- जैनशू क्वैंगशू
- सांडा - ५२ कि.ग्रॅ.
- सांडा - ६० कि.ग्रॅ.

कुंग फू या क्रीडा प्रकाराचे आयोजन आशियाई क्रीडा स्पर्धेत होत नाही. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार नियमावलीतील नियम क्र.४ अन्वये ऑलिंपिक, आशियाई किंवा कॉमनवेल्थ स्पर्धेत समावेश असलेल्या क्रीडा प्रकारांचा पुरस्काराकरीता विचार करण्यात येतो.

४.	श्रीमती कल्याणी जोशी यांनी याचिकेमध्ये सन २०२०-२१ या वर्षामध्ये पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या श्रीमती मिताली वाणी यांना २९व्या सिनियर राष्ट्रीय वूशू स्पर्धेत (दि. २५.०२.२०२१ ते दि. ०२.०३.२०२१) कुंग फू तायजी फॅन मध्ये व्दितीय व तायजी क्वान मध्ये तृतीय क्रमांक संपादन केल्याच्या प्रमाणपत्रास गुण देण्यात आले असल्याचे नमूद केले आहे. वुशू खेळाची राज्य संघटना म्हणजेच ऑल महाराष्ट्र वुशु असोसिएशन या संघटनेचे शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार नियमावलीनुसार छाननी केलेली कामगिरी पात्र ठरते किंवा कसे याबाबत अभिप्राय घेण्यात आले होते. ऑल महाराष्ट्र वुशु असोसिएशन यांनी श्रीमती मिताली वाणी या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारासाठी पात्र असल्याबाबत अभिप्राय दिले होते.

५.	श्रीम.जोशी व श्रीमती वाणी यांच्या अर्जांची छाननी केली असता असे निदर्शनास येते की, श्रीमती कल्याणी जोशी यांनी सादर केलेली जागतिक स्पर्धेची प्रमाणपत्रे ही कुंग फू या स्पर्धेची आहेत. कुंग फू या क्रीडा प्रकाराचा समावेश आशियाई क्रीडा स्पर्धेत नसल्याने सदर प्रमाणपत्राचे गुणांकन करण्यात आलेले नाही. तसेच, श्रीमती मिताली वाणी यांना ज्या प्रमाणपत्रांवरून गुणांकन केलेले आहे, त्या प्रमाणपत्रानुसार वुशू संघटनेने सदर स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. परंतु स्पर्धा बाब म्हणून कुंग फू या प्रकाराचा उल्लेख करण्यात आलेला आहे. वुशू या क्रीडा प्रकारात पुरस्कारासाठी तीन पुरस्कार वर्षाकरीता खेळाडू संवर्गात १२ अर्ज क्रीडा संचालनालयास प्राप्त झालेले आहेत. श्रीमती कल्याणी जोशी यांचे समान तत्वाने गुण देण्याच्या मागणीचा विचार केल्यास सर्व पुरस्कार अर्जांची नव्याने तपासणी करून घेणे व संबंधित संघटनांकडून अधिकृत खेळ प्रकार व त्यांच्या क्रीडा प्रमाणपत्रांबाबत अधिक माहिती प्राप्त करून घेणे क्रमप्राप्त आहे. जागतिक वुशू संघटनेच्या www.iwuf.org या वेबसाईटनुसार कुंग फू या क्रीडा प्रकाराच्या जागतिक स्तरावरील स्पर्धांचे आयोजन हे स्पोर्टस फॉर ऑल या तत्वावर करण्यात येते. कुंग फू या क्रीडा प्रकाराचे आयोजन खेळाडूंमध्ये कला व सांस्कृतिक देवाण घेवाण व्हावी या उद्देशाने केले जात असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वुशू या क्रीडा प्रकाराची सविस्तर तांत्रिक माहिती राज्य वुशू संघटना व राष्ट्रीय वुशू फेडरेशन यांचेकडून मागविण्यात आलेली आहे. सदर माहिती अद्याप अप्राप्त असल्याने या विषयाबाबत कमी कालावधीत निर्णय घेता येणे शक्य नाही.

तद्नुषंगाने, वुशू व कुंग फू या क्रीडा प्रकारांबाबत सविस्तर माहिती घेऊन वुशू व कुंग फू क्रीडा प्रकारांमध्ये पुरस्काराकरीता प्राप्त अर्जांबाबत योग्य निर्णय घेऊन पुरस्कार निवड समितीकडे शिफारस सादर करण्यासाठी आयुक्त, क्रीडा यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे उपसमिती स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | श्रीमती अंजली भागवत (खेलरत्न पुरस्कारार्थी) | सदस्य |
| ३ | श्री. काका पवार (अर्जुन पुरस्कारार्थी) | सदस्य |
| ४ | श्री. मनोज पिंगळे (अर्जुन पुरस्कारार्थी) | सदस्य |
| ५ | सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ६ | संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

उपरोक्त उपसमितीने सविस्तर चौकशी करून तत्संबंधीचा अहवाल राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीस एक महिन्यांत सादर करावा व राज्यस्तरीय पुरस्कार निवड समितीने उक्त अहवालाचे अनुषंगाने यथोचित निर्णय घेवून त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. सदर विषयी प्रस्तावित कार्यवाहीस काही कालावधी लागणार असल्याने सद्यस्थितीत श्रीमती मिताली वाणी यांना जाहीर करण्यात आलेला पुरस्कार स्थगित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज्ञानेश्वर आव्हाड)
कार्यासन अधिकारीमहाराष्ट्र शासन ,

प्रति,

१) मा.मंत्री, क्रीडा व युवक कल्याण यांचे खाजगी सचिव
२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक,
३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) श्रीम.कल्याणी जोशी (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत),
५) श्रीम.मिताली वाणी (आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत),
६) सरकारी अभियोक्ता, मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ.,
७) निवडनस्ती क्रीयुसे-२